बातमीपत्र

# पोलीस आयुक्तालय,सोलापूर शहर

## माहिती कक्ष, दि ०८ फेब्रुवारी २०२४

## जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ६०/२०२४ भादवि ३७९ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०५/०१/२०२४ रोजी ११.०० वा ते १५.३० कौतम चौक पुर्व मंगळवार पेठ सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०७/०२/२०२४ रोजी २०.४४ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सदानंद रामास्वामी वायलाल,वय-४७ वर्षे,रा- कौतम चौक पुर्व मंगळवार पेठ सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | | ३०,०००/- रू ची ग्रे रंगाची होन्डा ॲक्टिवा मो.सायकल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीच्या ताब्यातील मो.सायकल क्र एमएच १३ डी डी ३१४६ ही वरील ठिकाणी हॅन्डल लॉक करून पार्क करून ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीची वरील वर्णनाची व किंमतीची मो.सायकल ही फिर्यादीच्या संमतीवाचुन मुद्दाम लबाडीने चोरून नेली आहे. म्हणून. तपास:- पोह/१६८५/आरेनवरू-९१५६१२५१३२ |

## जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५९/२०२४ भादवि ४२० प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १६/०१/२०२४ रोजी १५.३० वा. एस.बी.आय.बॅक बाळीवेस सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०७/०२/२०२४ रोजी १९.५६ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | अशोक नारायण भोसले,वय-५५ वर्षे,रा- मु.गुळवंची पो.कारंबा ता.उत्तर सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात इसम |
| **फसवणूक र** | | ११,७००/- रूपये |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि १६/०१/२०२४ रोजी १५.३० वा. एस.बी.आय.बॅक बाळीवेस येथील स्टेट बॅकेच्या एटीएम मध्ये एटीएम कार्ड ऍक्टीव करण्यासाठी गेले असता एका अज्ञात इसमाने फिर्यादीचे एटीएम कार्ड अदला बदली करून एटीएम कार्डचा वापर करून ११,७००/- रूपये हे फिर्यादीचे समंतीवाचुन मुद्दाम लबाडीने काढून घेवून फिर्यादीची फसवणुक केली आहे.म्हणून. तपास:- पोह/१०७६/पवार-९०२२५८३३५३ |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५१/२०२४ भादवि २७९,३३७,३३८,४२७ सह मोवाकाक १८४/१७७ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०३/०२/२०२४ रोजी २०.३० वा चे सुमारास आसरा चौक ते महाविर चौककडे जाणारे रोडवर सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०७/०२/२०२४ रोजी १९.०२ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | विक्रम शाहिर सलगर वय-३८ वर्षे,रा-१/२,शुभंकर कॉलनी रत्नमंजिरी नगर जुळे सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | उर्वी नितीन गद्रे,रा- १३८/स्वागत नगर कुमठा नाका सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि ०३/०२/२०२४ रोजी २०.३० वा चे सुमारास आसरा चौक ते महाविर चौककडे जाणारे रोडवर फिर्यादी हा त्यांची मो.सायकल क्र एमएच १३ डी एच ७९९७ वरून घरी जाताना आसरा चौक ते महाविर चौक कडे जाणारे रोडवर सोलापूर येथील रोडवर नमुद आरोपी मजकूर यांनी तिचे ताब्यातील वाहन क्र एमएच १३ डी एक्स २०९१ ही भरधाव वेगाने बेदरकारपणे व हयगयीने चालवून फिर्यादीस धडक देवून जखमी केले तसेच फिर्यादीचे गाडीचे नुकसान केले व अपघाताची खबर पोलीसांना किंवा फिर्यादीचे नातेवाईकांना न देता निघून गेली आहे.म्हणून. तपास:- पोह/१२३४/गायकवाड-८९९९५०८५१९ |

# सलगरवस्ती पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १३/२०२४ भादवि ३०७,३८५,२९४,५०६,१४३,,१४७,१४९ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०५/०२/२०२४ रोजी १२.०० वा बेलाटी गावातील महादेव मंदिर येथे सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०७/०२/२०२४ रोजी १५.४८ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | अविनाश राजू गव्हाणे,वय-३२ वर्षे,रा- मुपो बेलाटी ता.उ.सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) भिवाजी वावरे,२) महादेव वावरे ३) गजानंद वावरे ४) प्रभू राठोड ५) संतोष वाघमारे सर्व रा-बेलाटी |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दोन वर्षापुर्वी फिर्यादीच्या शेतात रांगोळी कारखाना चालवयाचे असेल तर मला पैसे दे म्हणून आरोपी क्र १ हा फिर्यादीस वारंवार दमदाटी करीत होता ते पैसे न दिल्याने तसेच दि ०५/०२/२०२४ रोजी १२.०० वा बेलाटी गावातील अडी अडीचणी करीता गावातील महादेव मंदिर येथे ग्रामसभा मिटींग आयोजित करण्यात आली होती त्यावेळेस पिण्याच्या पाण्याच्या कारणावरून वरील आरोपीत यांनी मिळून फिर्यादीस शिवीगाळी दमदाटी करून लाथाबुक्यांनी मारहाण केली व आरोपी क्र १ यांने फिर्यादीचा जीवे मारण्याच्या उद्देशाने कटर ब्लेडने फिर्यादीस उजव्या दंडावर मारून जखमी केले व आरोपी क्र ३ यांने तेथेच पडलेला एक मोठा दगड त्याच्या दोन्ही हातानी उचलून फिर्यादीस जीवे मारण्याच्या उद्देशाने फिर्यादीच्या डोक्यात मारण्याकरीता फिर्यादीचे दिशेने फेकले तेवढयात फिर्यादी ने डोके बाजूला करून तो दगड चुकविला आहे.म्हणून. तपासः- वपोनि/चव्हाण-८१०८१०२००३ |